राज्य प्रशिक्षण धोरणानुसार, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद व डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थांच्या प्रशिक्षण विषयक बाबी व पदांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. यशदा २०१७/ प्रक्र.१२९/१७/१२-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक:- १५ मार्च, २०१८

वाचा :-
1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टिआरएन १०९५ /प्रक्र.१८१/९५/१२-अ दिनांक: १८ जून,१९९६
2. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टिआरएन १०९६/प्रक्र.३३/९६/१२-अ दिनांक: ७ डिसेंबर,१९९६
3. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टिआरएन ०९/प्रक्र.३९/०९/१२-अ दिनांक: २३ सप्टेंबर,२०११
4. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टिआरएन २०११/प्रक्र.२८७/११/१२-अ दिनांक: १४ ऑक्टोबर,२०१३
5. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. यशदा २०१४/४४१/प्रक्र.२८७/११/१२-अ दिनांक: ११ मे ,२०१५

प्रस्तावना:-

मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद व डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या दोन्ही संस्थांची स्थापना अनुक्रमे संदर्भाधीन क्र.१ व २ अन्वये करण्यात आली आहे. सदर संस्थामध्ये वर्ग-२ व वर्ग-३ च्या अधिकारी / कर्मचारी यांना कार्य विषयक प्रशिक्षण (On Job Training) तसेच, व्यवस्थापक प्रशिक्षण (Management Training) देणे अशी उद्दिष्टे ठरविण्यात आली होती. सदर संस्थाची स्थापन करतांना, संस्थेमध्ये अनुक्रमे १२ व १३ पदे कार्यरत होती. सदर पदे प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात.

२. त्यानंतर, संदर्भाधीन क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरण घोषित करण्यात आले असून त्यानुसार राज्यातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशासकीय प्रशिक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या निर्णयास अनुसरून संदर्भाधीन क्र.४ च्या शासन निर्णयान्वये ६ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था घोषित करण्यात आल्या असून या दोन संस्थांचा त्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. या संस्थांकरिता संदर्भाधीन क्र.५ च्या शासन निर्णयान्वये २० पदांचा एकसमान आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. तथापि, डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेचा विदर्भीय दर्जा कायम ठेवण्यात आल्यामुळे या संस्थेकरिता पूर्वीची १३ पदे व विभागीय संस्था म्हणून २० पदे अशी एकूण ३३ पदे आणि मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद या संस्थेमध्ये एकूण २० पदे सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. दोन्ही संस्थांमध्ये विविध संवर्गातील एकूण पदांपैकी ७५% पदे प्रतिनियुक्तीने व २५% पदे कंत्राटी पध्दतीने भरली जातात.

३. मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद या संस्थेची दि.१८.१२.२०१७ व दि.१९.१२.२०१७ या दोन दिवशी सदर प्रबोधिनीची कार्यकारी समितीची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीदरम्यान संस्थेच्या पदांबाबत व प्रशिक्षणाबाबत उपस्थित होणा-या अडी-अडचणींचे निराकरण करतांना खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत.

- **प्रतिनियुक्तीची पदे** :-राज्य प्रशिक्षण धोरणानुसार संस्थेमध्ये कायमस्वरुपी निवासी प्रशासकीय प्रशिक्षण घेण्यात येते. या निवासी प्रशिक्षणामुळे संस्थेच्या कामकाजाचे स्वरुप व्यापक होत चालले आहे. संस्थेची जंगम - मालमत्ता, ग्रंथालय, विविध रजिस्टर, नोंदवहया, कार्यालयीन कामकाज कागदपत्रे / नस्त्या, संस्थेचे लेखे यांचे जतन करणे. संस्थेच्या इमारती यांची देखभाल -दुरुस्ती, सुरक्षा व्यवस्था त्या अनुषंगाने येणा-या विविध बाबी यांचे परिक्षण करणे. याकरिता संस्थेमध्ये काही मूळ पदे (विशेषत: वर्ग-३ मध्ये) संस्थेमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.

- **प्रशिक्षण विषयक बाबी** :- प्रशिक्षणाचे स्वरुप हे लेक्चर बेस्ड व थेरॉटिकल स्वरुपाचे असल्यामुळे, ते जास्तीत - जास्त इंटर ॲक्टीव, अप्लाईड, व केस स्टडीजवर आधारित करणे.

४. उपरोक्त मुद्दे विचारात घेऊन, शासन, यशदा पुणे, व संस्थांचे प्रतिनिधी यांची समिती नेमण्याबाबत शासनाच्या विचाराधीन होते. याबाबींची आवश्यकता विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय: -

राज्य प्रशिक्षण धोरण २०११ अन्वये , मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद व डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थांच्या मंजूर पदांचा आढावा घेऊन, कायमस्वरुपी पदे भरणे, पदांचा सुधारित आकृतिबध मंजूर करणे व प्रशिक्षण पध्दतीत कालानुरूप सकारात्मक बदल करणे या विषयांच्या अनुषंगाने विचार विनिमय करण्यासाठी, महासंचालक, यशदा पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिका-याचे पदनाम	विभाग / प्रशिक्षण संस्था	
१	महासंचालक, यशदा पुणे	यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधीनी, यशदा पुणे.	**अध्यक्ष**
२	उपसचिव, प्रशिक्षण	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय.	**उपाध्यक्ष**
३	संचालक / निबंधक,	मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद	**सदस्य**
४	संचालक / निबंधक,	डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती	**सदस्य**

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल.

- प्रशिक्षण धोरणाचा व तद्नुषंगिक शासन निर्णय/परिपत्रके यांचा आढावा घेणे.
- पारंपारिक प्रशिक्षण पध्दतीत कालानुरूप आवश्यक सकारात्मक बदल करणे.
- प्रशिक्षणाच्या दृष्टीने संस्थेकरिता सुधारित पदांचा आकृतिबंध निश्चित करणे.
- आकृतिबंधातील प्रतिनियुक्ती /कंत्राटी व मूळ पदे निश्चित करणे.

समितीने संस्थांचा विषयानुरूप सर्वागिण अभ्यास करुन आपला अहवाल शासनास या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३१५१७२७०७३८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijaykumar Parshuram Soshte

Digitally signed by Vijaykumar Parshuram Soshte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=106ede43bb7dcc67e6404aaa146fb4c17a872b3754b63c343b66d6b91dd6b276, cn=Vijaykumar Parshuram Soshte
Date: 2018.03.15 17:46:53 +05'30'

(वि. प. सोष्टे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति.

१. मा. अ.मु.स. (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई ४०००३२
२. महासंचालक,यशदा पुणे
३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद/ अमरावती,
४. उप सचिव (प्रशिक्षण) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई ४०००३२
५. संचालक/ निंबधक, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर) पैठण, औरंगाबाद
६. संचालक/ निंबधक, डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.
७. अ.मु.स. (सेवा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई ४०००३२.
७. निवड नस्ती १२-अ